Let the mind manage the body
Que l'esprit gère le corps

# MARATHI
(Subject code No. P190)

Index Number: ..........................................................................................................................

# MAURITIUS EXAMINATIONS SYNDICATE

## Primary School Achievement Certificate Assessment

**2021-2022**

**Time: 1 hour 45 minutes** **Total Marks: 100**

**INSTRUCTIONS TO CANDIDATES**

1. Check that this assessment booklet contains **9** questions printed on **16** pages.
2. Write your Index Number on the assessment booklet in the space provided above.
3. You should not use red, green or black ink in answering questions.
4. Write all your answers clearly in the assessment booklet.
5. Attempt **all** questions.

| Question | Marking | | Revision | | Control | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Marks | Sig | Marks | Sig | Marks | Sig |
| 1A | | | | | | |
| 1B | | | | | | |
| 2A | | | | | | |
| 2B | | | | | | |
| 3 | | | | | | |
| 4A | | | | | | |
| 4B | | | | | | |
| 5A | | | | | | |
| 5B | | | | | | |
| 6 | | | | | | |
| 7A | | | | | | |
| 7B | | | | | | |
| 8 | | | | | | |
| 9 | | | | | | |
| **Total** | | | | | | |
| **Sig (HoG)** | | | | | | |

© Mauritius Examinations Syndicate

## Question 1A (5 marks)
## चित्र ओळखा आणि नाव लिहा. एक उदाहरण दिलेले आहे.



गाडी











Marks

**Question 1B (5 marks)**

**योग्य वाक्य आणि चित्र जुळवा. एक उदाहरण दिलेले आहे.**

बाई वर्गात शिकवत आहेत.



कुशल आंघोळ करत आहे.



नेहा सीमाला भेटवस्तू देत आहे.



मुले आपले पतंग उडवत आहेत.



जंगलात एक हत्ती आहे.



माझा भाऊ सैपाकघर साफ करत आहे.



Marks

**Question 2A (10 marks)**

**खाली दिलेल्या उत्तरांपैकी योग्य उत्तराच्या वर्णाभोवती वर्तुळ काढा. एक उदाहरण दिलेले आहे.**

**उदाहरणः** मांजर दूध _________.

अ. पित ब. पिते

क. पी ड. पिता

१. माझे वडील उद्या विमानाने भारतातून _________.

अ. येतील ब. याल

क. या ड. येशील

२. _________ सुट्टीत काजेलाला गेलो.

अ. ते ब. आम्ही

क. त्यांनी ड. आम्हाला

३. मिलाने पिशवी घेतली _________ ती बाजारात गेली.

अ. आणि ब. अथवा

क. परंतु ड. किंवा

४. सर्व मुले मैदानावर खेळ _________ आहेत.

अ. खेळतील ब. खेळत

क. खेळ ड. खेळेल

५. _________ कपाटात कपडे ठेवते.

अ. आजीने ब. आजीची

क. आजीचा ड. आजी



Please turn over this page

Marks

६. रात्री आमचा कुत्रा चोराला __________ भुंकत होता.

अ. पाहिले ब. पाहिला

क. पाहून ड. पाहा

७. रोज सकाळी आई फिरायला __________ .

अ. जातात ब. जाते

क. जाता ड. जातोस

८. तू _________ गेला होतास?

अ. कशी ब. कोणाला

क. कोणी ड. कोठे

९. गुलाबाचे __________ सुंदर आहे.

अ. फूल ब. फुलाला

क. फुले ड. फुलाने

१०. रस्त्या__________ खूप गाड्या आहेत.

अ. वर ब. पासून

क. तून ड. हून

Marks

**Question 2B (5 marks)**

**खाली दिलेल्या उत्तरांपैकी योग्य उत्तराच्या वर्णाभोवती वर्तुळ काढा.**

१. माझे वडील _________ जेवण तयार करतात.

अ. झोपायच्या खोलीत ब. ऑफिसात

क. स्वयंपाकघरात ड. स्नानगृहात

२. मी खूप थकलो आहे. मी लवकर _________ जाईन.

अ. पाहायला ब. पोहायला

क. झोपायला ड. धावायला

३. कृपया माझ्यासाठी एक _________ आण. मला बसायचे आहे.

अ. मेज ब. पेन

क. ताट ड. खुर्ची

४. काकांची गाडी जुनी आहे. ते नवी गाडी_________ करतील.

अ. खरेदी ब. बोलतील

क. बनवतील ड. ऐकतील

५. मी माझी वही _________ ठेवतो.

अ. पट्टीत ब. दप्तरात

क. रूमालात ड. दरवाजात

Marks

**Question 3 (10 marks)**
**खालील पत्र वाचा आणि त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

प्रिय शीला,

तू कशी आहेस? मी ठीक आहे. मी सध्या दुबईत माझी सुट्टी घालवत आहे. आज गुरुवार आहे. ४.३० वाजले आहेत आणि मी जुमेरिया या समुद्रकिनारी बसले आहे. दुबई अतिशय सुंदर शहर आहे म्हणून मला ते आवडते. मला इथली खूप गरमी आवडत नाही. मी दररोज पोहायला जाते. मी पुष्कळ खरेदी केली आहे. मी तुझ्यासाठी सुंदर झगा विकत घेतला आहे.
मी १४ जुलैला परत येणार आहे.
संध्याकाळी ७ वाजता मी मॉरिशसला पोहोचेन.
मी तुला शाळेत १६ जुलैला भेटेन. आता मी जास्त वाट पाहू शकत नाही.

तुझी मैत्रीण
प्रिया

**पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. प्रियाने हे पत्र कोणाला लिहिले आहे?

______________________________ [1]

२. प्रिया दुबईला का गेली आहे?

______________________________ [1]

३. कोणत्या दिवशी प्रियाने पत्र लिहिले आहे?

______________________________ [1]

Marks

४. प्रियाला दुबई का आवडली?

________________________________________ [1]

५. दुबईतील हवामान कसे आहे?

________________________________________ [1]

६. प्रियाने दुबईत काय केले? दोन उत्तरे द्या.

i. ____________________________________ [1]

ii. ____________________________________ [1]

७. प्रियाने कोणती भेट विकत घेतली?

________________________________________ [1]

८. ती मॉरिशसला किती वाजता पोहोचेल?

________________________________________ [1]

९. प्रिया शाळेत कधी जाईल?

________________________________________ [1]

Marks

## Question 4 (15 marks)

**खालील उतारा वाचा आणि दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

एक आठवड्यानंतर तारा आणि तिचे कुटुंब रोद्रिगहून घरी परत आले होते.



फ्रिज

" घरी परत येणे ठीक आहे, नाही का ?" आई म्हणाली.
ताराने मान हलवत म्हटले, "आई मला भूक लागली आहे."
" आपल्या फ्रिजमध्ये दूध, अंडी आणि भाज्या आहेत."
आईने उत्तर दिले.
" मला रात्रीचे जेवण तयार करायचे आहे." बाबा म्हणाले.
"बाबा! तुम्ही बिर्याणी कराल का?" ताराने विचारले.

सर्वजण घरात शिरताच,काहीतरी ठीक नसल्याचे त्यांना कळले. संपूर्ण घरात घाण वास येत होता. हा घाण वास कोठून येत होता?

आईने झोपायच्या खोलीत आणि बागेत पाहिले. ताराने स्नानगृहात पाहिले.
"तेथून घाण वास येत आहे." बाबांनी स्वयंपाकघरातील फ्रिजकडे बोट दाखवत म्हटले. "चला आपण फ्रिज उघडून आत काय आहे ते पाहू या." आईने फ्रिज उघडताच सर्वांनी नाक झाकले.

"आतमध्ये गरम आहे आणि फ्रिजचा दिवा बंद आहे." आई म्हणाली.
"काय झाले?" ताराने विचारले.
"फ्रिज काही वेळेपूर्वी बंद पडला आहे. सर्व काही खराब झाले आहे." बाबा म्हणाले.
"दूध खराब झाले आहे का?" ताराने विचारले.
"होय, दूध थंड असले की चांगले राहते." आईने उत्तर दिले.
"पाव खराब झाला आहे का?" ताराने विचारले.
"होय, पाहा पावाचा रंग बदलून हिरवा झाला आहे. तू जर तो खाल्लास तर आजारी पडशील." बाबा म्हणाले.
"भाज्यापण खराब झाल्या आहेत का?" ताराने उदास होत विचारले.

Marks

"होय, त्यापण खराब आहेत. त्यांना आपण खाऊ शकत नाही." आईने उत्तर दिले.
ताराने एक अंडे उचलले. ते तिच्या हातून खाली पडले. आता तर अतिशय घाण वास येऊ लागला. अंडीसुध्दा खराब झाली होती. तारा यानंतर नक्कीच अंडे खाणार नाही. तारा "ई..ई.." असे म्हणत रडत पळू लागली.
शेवटी बाबांनी सर्व खराब अन्न कचरापेटीत टाकले आणि फ्रिज साफ केला.

घाण वास – Bad smell

**Question 4A (5 marks)**

**खाली दिलेल्या उत्तरांपैकी योग्य उत्तराच्या वर्णाभोवती वर्तुळ काढा.**

१. तारा आणि तिचे कुटुंब घरापासून _________ दूर होते.

अ. एक दिवस

ब. एक आठवडा

क. एक महिना

ड. एक वर्ष

२. ताराला _________ खाण्यास हवी होती.

अ. पाव

ब. भाज्या

क. अंडी

ड. बिर्याणी

३. _________ एक समस्या होती.

अ. स्वयंपाकघरात

ब. स्नानगृहात

क. झोपायच्या खोलीत

ड. बागेत

Marks

४. जेव्हा आईने फ्रिज उघडला तेव्हा ________

अ. आत थंड होते.

ब. सर्वांनी नाक झाकले.

क. अन्न ताजे होते.

ड. दूध चांगले होते.

५. या उताऱ्यात, शेवटी बाबांनी कचरापेटीत ________ .

अ. अन्न टाकले

ब. अन्न खाल्ले

क. अन्न शिजवले

ड. अन्न ठेवले

**Question 4B (10 marks)**

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. सर्व कुटुंब कोठे गेले होते?

________________________________________________ [1]

२. कोण रात्रीचे जेवण तयार करणार होते?

________________________________________________ [1]

३. सर्वांना काहीतरी बरोबर नाही हे कसे कळले?

________________________________________________ [1]

Marks

४. जेवण खराब का झाले?

________________________________________________ [1]

५. जर ताराने  पाव खाल्ला असता तर काय झाले असते?

________________________________________________ [1]

६. तारा परत कधीही अंडे  का खाणार नाही?

________________________________________________ [1]

**७.  पुढील वाक्ये उताऱ्यानुसार योग्य क्रमात लिहा. पहिले वाक्य देण्यात आले.**

| | |
|---|---|
| • तारा रडत पळू लागली. | |
| • बाबांनी फ्रिज साफ  केला. | |
| • आईने फ्रिज उघडला. | |
| • सर्व कुटुंब घरी आले. | १ |
| • ताराच्या हातून अंडे खाली पडले. | |

[4]

Marks

**Question 5A (4 marks)**

**वाक्ये दिलेल्या सूचनेप्रमाणे लिहा.**

**(अ) खालील शब्द योग्य क्रमाने लिहून वाक्ये लिहा.**

१. सुंदर – मीनाच्या - आहे – घरापुढे – फुलबाग– एक

______________________________________________

______________________________________________

२. समुद्रकिनारी –मी – गेलो – फिरायला – मावशीबरोबर

______________________________________________

______________________________________________

**Question 5B (6 marks)**

**(ब) खाली दिलेली अपूर्ण वाक्ये पूर्ण करा.**

१. आजोबा आजारी आहेत म्हणून ______________________

______________________________________________

२. जेव्हा आम्ही घरी गेलो तेव्हा ______________________

______________________________________________

३. काल अंजू शाळेत गेली नव्हती कारण ______________________

______________________________________________

Marks

**Question 6 (10 marks)**

**खालील गोष्ट वाचून मोकळया जागी योग्य शब्द भरा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **पाहात** | **गोष्ट** | **भीती** | **आनंदाने** | **गात** |
| **लावला** | **एकत्र** | **आकाशात** | **आराम** | **त्या** |

एके दिवशी संध्याकाळी रोहनच्या कुटुंबाने बागेमध्ये रात्रीचे जेवण घ्यायचे ठरवले. रोहनला अंधाराची _________ वाटत असे. म्हणून बाबांनी दिवा _________. चंद्र _________ चमकत होता. रोहन नेहमी टीव्ही _________ होता. आता तो _________ बागेत खेळत होता. दिवसभर काम करून थकलेले पालक _________ करत होते. काही वेळानंतर बाबांनी राजा आणि राणीची सुंदर _________ सांगितली. सगळ्या कुटुंबाने छान गाणी _________ वेळ घालवला. त्यांनी _________ रात्रीच्या जेवणाचा आनंद घेतला. सर्वांनी _________ रात्री खूप मजा केली. ते खूप उशीरा झोपले.

Marks

**Question 7A (5 marks)**

**खाली दिलेल्या वाक्यात काही चुकीचे शब्द अधोरेखित आहेत. कंसातील मोकळया जागी त्या शब्दाचे योग्य रूप लिहा.**

१. राजू **माझी** भाऊ आहे. (__________)

२. त्या दिवशी मोठा **पऊस** पडला. (__________)

३. झाडावर **पिवळय** रंगाचे फूल आहे. (__________)

४. उद्या ताईचा **वाडदिवस** आहे. (__________)

५. अमोल गरम **पानी** पितो. (__________)

**Question 7B (5 marks)**

**कंसातील शब्दांचे योग्य रूप लिहून वाक्ये पूर्ण करा.**

१. राजीव खूपच (गुण) ___________ मुलगा आहे.

२. आईने दोन (साडी) ___________ विकत घेतल्या.

३. आमच्या अंगणात झाडावर (पिकला) ___________ आंबे आहेत.

४. अमर (दुर्दैव) ___________ खाली पडला.

५. तो खूपच (आळस) ___________ आहे.

**Question 8 (10 marks)**

**खाली दिलेल्या प्रत्येक चित्रावर एक वाक्य लिहून <u>गोष्ट</u> लिहा. तुम्हाला दिलेल्या शब्दांचाच वापर करावा.**



एके दिवशी – झाड लावणे



दर दिवशी – पाणी घालणे



काही वर्षांनंतर – फळे



कधीकधी – चढणे



खूप गरमी – झाड

Marks

**Question 9 (10 marks)**

**दिलेल्या मुद्यांच्या आधारे सुमारे १०० शब्दांचा एक निबंध लिहा.**

- चोर वर्गात शिरणे.
- चोर चोरी करणे.
- तुम्ही आणि तुमच्या मित्रांनी चोर पाहणे.
- नंतर तुम्ही आणि तुमचे मित्र काय करणे?
- शेवटी काय होते?

Marks



Please turn over this page

BLANK PAGE